आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
११ मार्च २०२५ मंगळवार

**ठळक बातम्या**

- प्रार्थनास्थळावरचे भोंगे रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत बंद ठेवावे लागणार, मर्यादित कालावधीसाठीच परवानगी देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- वाहन चालकांनी केलेल्या अंमली पदार्थांच्या सेवनाचीही चाचणी होणार, परिवहन मंत्र्यांची माहिती
- येत्या तीन वर्षांत केंद्र सरकार देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उभारणार

**आणि**

- येत्या २ दिवसात कोकण आणि अकोल्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<><><><><>**

प्रार्थनास्थळांवर भोंगे लावण्यासाठी कुणालाही सरसकट परवानगी देणार नाही. मर्यादित कालावधीसाठी ही परवानगी दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली. पुन्हा परवानगी हवी असल्यास पुन्हा अर्ज करावा लागेल. हे भोंगे रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत भोंगे लावता येणार आहेत. याच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक पोलीस निरीक्षकाची असेल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड - मुख्यमंत्री... (२० सेकंद)**

**<><><><><>**

नंदूरबार जिल्ह्यात धडगाव तालुक्यातल्या ज्या गावांना अपारंपरिक पद्धतीने वीजपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे, त्यांना पारंपरिक पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. यासाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जन मन योजनेतूनही निधी मिळणार असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात गेल्या तीन वर्षांत एक लाखापेक्षा जास्त रस्ते अपघातांची नोंद झाली असून त्यात जवळपास ४६ हजार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. २०२२ ते २०२४ या कालावधीत अपघातांच्या संख्येत सातत्यानं वाढ झाल्याचं सरनाईक यांनी दिलेल्या आकडेवारीतून दिसून येत आहे. वाहन चालकानं मद्यपान केलं आहे का, याची चाचणी करणाऱ्या यंत्रांसोबतच त्यांनी अन्य अंमली पदार्थांचं सेवन केलं आहे का, हे देखील तपासणारी यंत्रं मागवण्याची प्रक्रिया राज्य सरकार राबवत असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. राज्यानं अद्याप महामार्गांवर इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम लागू केलेली नसल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

राज्याच्या आगामी आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पावर आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात चर्चा सुरू आहे. या संदर्भात अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

## होल्ड - VC

*निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्षाने केवळ आकर्षक घोषणा करत आश्वासनांचा पाऊस पाडला, मात्र अर्थसंकल्पात याची अंमलबजावणी केली नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी विधानसभेत केली. राज्याची महसुली तूट ४५ हजार कोटींची आहे, एक लाख कोटींच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत, त्यामुळे राज्याची आर्थिक शिस्त बिघडली असल्याचं ते म्हणाले. हा अर्थसंकल्प राज्याला कर्जाच्या खाईत ढकलणारा असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. राज्याची तिजोरी रिकामी झाली असून एवढ्या मोठ्या महसुली तुटीचा अर्थसंकल्प इतिहासात पहिल्यांदाच सादर झाला आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प बडा घर पोकळ वासा असल्याचं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मांडलं. तर अर्थसंकल्पात सर्वसामान्यांसाठी काहीही नसून हा श्रीमंतांचा अर्थसंकल्प असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली. आर्थिक शिस्त बिघडल्याचा विरोधकांचा आरोप खोटा असून कृषी, रोजगार, सामाजिक विकास या सर्व क्षेत्रांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प असल्याचं शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी सांगितलं. विकासचक्राला गती देण्याचं काम या अर्थसंकल्पातून झाल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितलं.*

*राज्याची आर्थिक स्थिती ढासळली असल्याचं या अर्थसंकल्पात प्रतिबिंबित झालं आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला सुरुवात करताना केली. राज्यावर सद्यस्थितीत दरडोई ८२ हजाराचं कर्ज आहे. भांडवली खर्चात कपात करण्याची वेळ राज्य सरकारवर आलेली असताना खर्च वाढवणाऱ्या योजना सरकार कशा राबवणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. दूरगामी परिणाम करणाऱ्या योजनांच्या निधीमध्ये कपात करून सरकार अनुत्पादक खर्चाला प्राधान्य देत आहे असं दानवे म्हणाले. हा अर्थसंकल्प गरीब, कष्टकरी, कामगार, महिला,*

*शेतकरी आणि युवा वर्गाला पुढे घेऊन जाणारा असल्याचं मत भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी विधान परिषदेत व्यक्त केलं. हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि संतुलित असल्याचं ते म्हणाले.*

**<><><><><>**

येत्या तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उघडण्यात येतील, अशी माहिती आज राज्यसभेत केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्‌डा यांनी एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. पुढच्या आर्थिक वर्षात दोनशे डे केअर कॅन्सर सेंटर उघडली जातील, असंही नड्‌डा म्हणाले.

**<><><><><>**

खादी कारागिरांचं वेतन येत्या १ एप्रिलपासून २० टक्क्यांनी वाढवण्याची घोषणा खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी केली आहे . ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. गेल्या ११ वर्षांमध्ये सरकारने खादी कारागिरांचं वेतन २७५ टक्क्यांनी वाढवलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईहून अवैधरीत्या लंडनला जाणाऱ्या ८ जणांना आज पोलिसांनी छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली. हरयाणात हिसार इथल्या खासगी विद्यापीठाचे ७ विद्यार्थी आणि एक प्राध्यापक, युवा विनिमय कार्यक्रमाअंतर्गत लंडनला जात असल्याचं भासवून हे सर्व ८ जण लंडनला निघाले होते. मात्र इमिग्रेशन खिडकीवर त्यांच्या सांगण्यात विसंगती

आढळल्यानं त्यांची कसून तपासणी करण्यात आली. तेव्हा त्यांनी कबुली दिली. मानवी तस्करीच्या आरोपाखाली त्यांना ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात पिंपळगाव बसवंत इथे आज शेतकऱ्यांनी धरणं आंदोलन करत कांदा लिलाव बंद पाडले. गुरुकृपा आडत संघटनेच्या व्यापाऱ्यांनी टोमॅटो खरेदीचे तीन कोटी रुपये थकवल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. चार महिने होऊनही थकबाकी मिळालेली नाही, शेतमालाचे पैसे मिळत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. आंदोलन सुरू असलं तरी बाजार समितीने केलेल्या मध्यस्थीमुळे लिलाव पूर्ववत सुरू झाले.

**<><><><><>**

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीनं सभापती आणि माजी खासदार देविदास पिंगळे यांच्या विरोधात आज अविश्वास ठराव मंजूर केला आहे. नाशिक उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज बाजार समिती संचालकांची बैठक झाली. त्यामध्ये मांडलेला अविश्वास ठराव १५ विरुद्ध शून्य मतांनी मंजूर झाला. या बैठकीला देविदास पिंगळे उपस्थित नव्हते. दरम्यान, उपसभापती विनायक मळेकर यांच्याकडे सध्या सभापती पदाची सूत्रे देण्यात आली असून लवकरच सभापती पदासाठी निवडणूक घोषित होईल.

**<><><><><>**

लातूर जिल्हा काँग्रेस समितीचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. विधानसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार धीरज विलासराव देशमुख यांच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपण हा राजीनामा देत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

धुळे जिल्ह्यात काही व्यक्तींनी समाजमाध्यमांवर इतर धर्माबद्दल आक्षेपार्ह विधानं केल्याचा प्रकार निदर्शनाला आल्यानंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करून अटक केली आहे. सायबर पोलिसांचं समाजमाध्यमांवर बारीक लक्ष असून जातीय तेढ निर्माण करणाऱ्या किंवा समाजात अशांतता पसरवणाऱ्या पोस्ट समाजमाध्यमांवर टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा धुळे जिल्हा पोलीसांनी दिला आहे.

<><><><><>

पुणे महापालिकेकडून जीबीएस रुग्णांना आर्थिक मदत देण्यात येत आहे. आतापर्यंत १० रुग्णांना प्रत्येकी २ लाखांची मदत देण्यात आली, तर शहरी गरीब योजनेत बसत नसलेल्या २८ रुग्णांना प्रत्येकी १ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. जीबीएसवरच्या उपचारांसाठी आयव्हीआयजी इंजेक्शन आणि प्लाझ्मा फेरेसिसचे उपचार दिले जात आहेत. या उपचारांसाठी पाच ते आठ लाख रुपये खर्च येतो. जीबीएस रुग्णांना आर्थिक मदत देण्याच्या योजनेला महापालिका आयुक्तांनी यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

**<><><><><>**

येत्या २ दिवसात कोकणात सर्वत्र आणि अकोला जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. आज मुंबईत सांताक्रूझ इथं ३९ पूर्णांक २ तर रत्नागिरीत ३९ पूर्णांक ४ अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली.

//<><><><><>//